Estd.1962
NACC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवकांना कळविण्यात येते की, जावक क्रमांक आस्थापना /५४६ दिनांक १२ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या परिपत्रकाव्दारे बायोमेट्रीक थंब इम्प्रेशनव्दारे घेतली जाणारी दैनंदिन हजेरी दिनांक १५/०२/२०२१ पासुन पुन्हा सुरू करण्यात आली होती.

तथापि कोविड – १९ संसर्गाचा धोका टाळण्यासाठी व संसर्ग पसरू नये याकरिता खबरदारीचा उपाय म्हणुन बायोमेट्रीक थंब इम्प्रेशनव्दारे घेतली जाणारी नियमित सेवेतील सर्व प्रशासकीय अधिकारी, व सेवकांची दैनंदिन हजेरी दिनांक २२/०२/२०२१ रोजी सायंकाळ पासुन व सर्व शिक्षकांची बायोमेट्रीक थंब इम्प्रेशनव्दारे घेतली जाणारी दैनंदिन हजेरी दिनांक २३/०२/२०२१ रोजी सायंकाळ पासुन बंद करण्यात येत आहे.

परंतु बायोमेट्रीक थंब इम्प्रेशन ऐवजी दिनांक २३/०२/२०२१ रोजी पासुन नियमित सेवेतील सर्व प्रशासकीय अधिकारी, व सेवकांची दैनंदिन हजेरी ही R.F.I.D कार्डने बायोमेट्रीक मशीनव्दारे नोंदवली जाणार आहे. तसेच, सर्व शिक्षकांची दिनांक २४/०२/२०२१ रोजी पासुन दैनंदिन हजेरी ही R.F.I.D कार्डने बायोमेट्रीक मशीनव्दारे नोंदवली जाणार आहे. यानुसार सर्व संबधीतांनी आपल्या विभागाच्या इमारतीतील मशिनव्दारे R.F.I.D कार्डने आपली दैनंदिन हजेरी नोंदवावयाची आहे. अन्यत्र R.F.I.D कार्डने आपली दैनंदिन हजेरी नोंदवलेचे आढळलेस सेवा नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

विद्यार्थी भवन, युसिक, सी.एफ.सी. व विद्यापीठ मुद्रणालय या अधिविभागातील थंब इम्प्रेशन मशिन पुर्ववत चालु होईतोपर्यत या अधिविभागातील सेवकांनी त्यांच्या विभागाच्या जवळच्या इमारतीतील मशिनव्दारे R.F.I.D कार्डने आपली दैनंदिन हजेरी नोंदवावयाची आहे.

याकरीता नियमित सेवेतील सर्व प्रशासकीय अधिकारी, व सेवकांनी दिनांक २२/०२/२०२१ रोजी दुपारी ३.०० नंतर मुख्य प्रशासकीय इमारतीतील संगणक केंद्र येथे येऊन आपले R.F.I.D कार्ड घ्यावे. शिक्षकांना दिनांक २३/०२/२०२१ रोजी R.F.I.D कार्ड वितरीत केली जातील. येते वेळी सोबत कार्यालयाने दिलेले ओळख पत्र घेऊन यावे.

ज्या प्रशासकीय अधिकारी, व सेवकांची २३/०२/२०२१ रोजीची दैनंदिन हजेरी R.F.I.D कार्ड प्रणालीव्दारे होणार नाही, अशा प्रशासकीय अधिकारी, व सेवकांनी व ज्या शिक्षकांची २४/०२/२०२१ रोजीची दैनंदिन हजेरी R.F.I.D कार्ड प्रणालीव्दारे होणार नाही, अशा शिक्षकांनी यावाबत त्याच दिवशी विभाग प्रमुख, संगणक केंद्र यांना लेखी अवगत करावे.

तरी, कोवीड–१९ विषाणुचा प्रादुर्भाव टाळणेसाठी सर्व प्रशासकीय अधिकारी, व सेवकांनी R.F.I.D कार्डव्दारे आपली दैनंदिन हजेरी नोंदवताना दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवावे. तसेच, केंद्र/राज्य शासन/जिल्हा प्रशासन यांनी कोवीड – १९ बाबत वेळोवेळी पारीत केलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे.

माहे मार्च २०२१ मध्ये विद्यापीठास नॅक पियर टिम भेट देणार असलेने सर्व शिक्षक अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयास कोवीड–१९ विषाणुच्या अनुषगांने योग्य ती खबरदारी घेऊन १०० टक्के उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/ ६७९
दिनांक : 22 FEB 2021

प्रति,

१. मा.कुलगुरू/प्र–कुलगुरू/कुलसचिव/संचालक,परीक्षा व मुल्यमापन मंडळ/वित्त व लेखाधिकारी यांचे कार्यालय
२. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, रेक्टर्स, व सर्व प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी सदरचे परीपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षेकेतर सेवकांचे निदर्शनास आणावे.
३. प्रभारी संचालक, संगणक केंद्र यांना :– माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाही साठी



E:circular